# Recognition by Regional Print Media for Extension Activities

दैनिक
जनसत्य
नि:पक्ष नजर...,नि:पक्ष खबर...

# नाचणारी तरुणाई वाचणारी होईल तेंव्हा ती क्रांती करतील

**जनसत्य प्रतिनिधी**

**अकलूज : इंदापूर तालुक्यातील तरंगवाडी येथे विद्याप्रतिष्ठाचे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय इंदापूरचे राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.**

या शिबिराला दि.२८ फेब्रुवारी २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक डॉ. प्रकाश पांढरमिसे. यांनी सदिच्छा भेट दिली. व विध्यार्थ्यांना आजची तरुणाई या विषयावर व्याख्यानपर मार्गदर्शन केले.त्याप्रसंगी ते म्हणाले ,विधप्रतिष्ठान संस्थेने इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्याचा फायदा इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांना होतो आहे.त्याचा अधिकाधिक लाभ विद्यार्थ्यांना होतो आहे.या विद्यार्थ्यांनी शिकून मोठे व्हावे व महाविद्यालया सह संस्थेचे व आपल्या गावाचे नाव मोठे करावे. आजच्या महाकाय स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.तरचआजच्या या वाढत्या स्पर्धेच्या युगात तुम्ही टिकू शकाल.

आजच्या तरुणाईने ज्यांच्या हाती शून्य होते.अशा शून्यातून विश्र् निर्माण केलेल्या कर्तबगार व्यक्तींच्या यशोगाथा, जीवनगाथा वाचल्या पाहिजेत. इतिहासात होऊन गेलेल्या महापुरुषांचा भूतकाळ जरूर वाचावा. या भूतकाळाचा वर्तमान बनवावा. तोच येणाऱ्या पुढच्या पिढीसाठी भविष्यकाळ होईल. महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी साजऱ्या करताना वाद्यांचा जागर करण्याऐवजी विचारांचा जागर करायला हवा. महापुरुषांना डोक्यावर घेऊन नाचण्याऐवजी त्यांनी सांगितलेले विचार डोक्यात घेऊन त्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे. तरुणाईच्या सळसळत्या रक्ताला अशक्य असं काहीच नसतं. युवा



या शब्दाला उलटा करा तो वायू होतो. जो वायूच्या वेगाने जाऊन प्रगतिकारक परिवर्तन घडवू शकतो. ती जिद्द प्रत्येकाने अंगी बाळगली पाहिजे.आजच्या या तरुणाईने 'नाचण्या' ऐवजी 'वाचण्याला' जर महत्व दिलं तर ही तरुणाई क्रांतीमय परिवर्तन करू शकतते.आजच्या या महाकाय स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर तरुणाईने ज्ञानाच्या विविध क्षेत्रात यश आणि संशोधन संपादित केले पाहिजे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवशीय शिबीर शिबिरात सहभागी झालेल्या विध्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकते. श्रमसंस्कारा बरोबरच वर्तनात परिवर्तन घडवून आयुष्याला सकारात्मक दिशेने नेहू शकते. असे मत डॉ. प्रकाश पांढरमिसे यांनी व्यक्त केले व शिबिरार्थी विध्यार्थ्यांना शिबिरातील उरलेल्या दिवसांसाठी शुभेच्छा दिल्या.

गावातील यशवंत प्रहार संघटनेचे अध्यक्ष डॉ.शशिकांत तरंगे, सरपंच कान्हूपाथरा जाधव, उपसरपंच कांतीलाल जाधव, संतोष जाधव यांचे शिबिरासाठी आम्हाला विशेष सहकार्य मिळाल्याचे नमूद केले.

यावेळी तरंगवाडी गावचे ग्रामसेवक बाळकृष्ण वाघ व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी शिबिराविषयी आपले अनुभव शेअर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.फारुख तांबोळी यांनी केले तर प्रा. चैतन्य सावंत यांनी आभार मानले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विध्यार्थी - विध्यार्थिनीं व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढारी



कल्याण (ता. हवेली) येथे विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद.

# राष्ट्रीय सेवा योजनेतून पाणी व्यवस्थापन करा

## मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांचा सल्ला

**खेड शिवापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना सध्या सुरू आहेत. यामध्ये जल जीवन मिशन ही सर्वात मोठी योजना आहे. या योजनेचे गावकऱ्यांनी व्यवस्थित नियोजन करून गावामध्ये पाणी व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यामुळे भविष्यात गावातील पिण्याच्या पाण्याचा व इतर प्रश्न सोडविता येईल, असा सल्ला पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी दिला.

सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या कल्याण (ता. हवेली) येथे ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी कॉलेज ऑफ इंजिनिरिंग यांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन केले होते. त्या कार्यक्रमाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी कल्याण गावचे सरपंच राजेश डिंबळे, उपसरपंच सीताराम डिंबळे, माजी पंचायत समिती सदस्य मनोहर डिंबळे, राजेंद्र डिंबळे, अरुण डिंबळे, अनंता डिंबळे, बाळासाहेब डिंबळे, विठ्ठल डिंबळे, महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

गावात झालेल्या विकासकामांबद्दल येथील सामाजिक कार्यकर्ते ऋषिकेश डिंबळे यांनी माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांसोबत क्रिकेट खेळण्याचा आनंद आयुष प्रसाद यांनी घेतला. ग्रामस्थांच्या वतीने आयुष प्रसाद यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक एनएसएस विभागाचे प्रमुख डॉ. नाना शेजवळ यांनी, तर सूत्रसंचालन ऋषिकेश डिंबळे यांनी केले.

My Gramin Edition
Mar 12, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# राज्यस्तरीय विज्ञान सन्मान पुरस्काराचे वितरण

## चिंचवडमध्ये साडेतीनशे विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड; व्याख्यात्यांचा सन्मान

**पिंपरी, ता. १६ :** जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, माध्यमिक विज्ञान अध्यापक संघ, पुणे ड्रीम फाउंडेशन व मराठी विज्ञान परिषद पुणे यांच्यावतीने राज्यस्तरीय विज्ञान सन्मान पुरस्कार वितरण समारंभ पार पडला.

चिंचवड येथील विज्ञान केंद्रात उद्घाटन बालवैज्ञानिक शर्विन कुऱ्हाडे याच्या 'थर्ड आय फॉर ब्लाइंड' या प्रयोगाने झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जे. के. सोलंकी (एनसीआरए पुणे), डॉ. भाऊसाहेब कारेकर (शिक्षणाधिकारी, ठाणे ), प्रवीण तुपे, विनय राजेंद्र, प्राचार्य विक्रम काळे, रोहिदास एकाड, रमेश दाते, डॉ. नाना शेजवळ, डॉ. संजय ढोले, अशोक तातुगडे उपस्थित होते. कोरोना काळात शाळा बंद असताना स्पर्धा परीक्षांना विज्ञान अध्यापक संघाच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून दररोज ऑनलाइन शिक्षण देण्यात आले. यासाठी जवळजवळ तीन ते साडेतीन हजार विद्यार्थी दररोज उपस्थित असायचे. त्याची फलनिष्पत्ती म्हणजे त्यातील ३५० गुणवंत विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. या विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. विज्ञान अध्यापक संघाच्यावतीने विज्ञानाच्या पंचावन्न व्याख्यात्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला .

मराठी विज्ञान परिषदेच्यावतीने रावसाहेब चौधरी, संजीव वाखारे, अशोक सोनवलकर, देवराव कांबळे, वैशाली सैंदाणे, रोहित डामरे, अंजली चिखले-वाळुंज, संभाजी ठुबे, ज्योती दीक्षित, गोरख तावरे व सतीश ढोरे यांना सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने नागपूर, कोल्हापूर, नगर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, गोवा येथील विज्ञानाचे तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते .

अनिल साकोरे, संजीव वाखारे, रावसाहेब चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. साधना सपाटे व सुनील पोटे यांनी आभार मानले .



**चिंचवड :** जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, माध्यमिक विज्ञान अध्यापक संघ, पुणे ड्रीम फाउंडेशन व मराठी विज्ञान परिषदेच्या वतीने राज्यस्तरीय विज्ञान सन्मान पुरस्कार वितरण करण्यात आले.

पुढारी

# आमदारांनी दत्तक घेऊनही कल्याण तहानलेले

**खेड शिवापूर : पुढारी वृत्तसेवा**

**सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या तसेच ऐतिहासिक वारसा लाभलेल्या कल्याण (ता. हवेली) या गावात सध्या शेतीच्या व वापराच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. मागील पाच वर्षात खडकवासला विधानसभेचे आमदार भीमराव तापकीर यांनी हे गाव दत्तक घेतले होते. मात्र, गावामध्ये कोणताही बदल झाला नसून गावाची परिस्थिती 'जैसे थे' असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.**







**विहिरीने तळ गाठलेला दिसत आहे. दुसरीकडे विहिरीतून पाणी उपसून आणताना महिला, तर तिसरीकडे पाण्याअभावी पडीक असलेली जमीन.**

सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या कल्याण गावच्या हद्दीत शिवगंगा नदीचा उगम झाला आहे. परंतु, खडकाळ भाग व उन्हाच्या अतितीव्रतेने नदीमधील पाणी कमी झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणीच नसल्याने शेकडो एकर जमीन मशागतीविना पडली आहे. आमच्या गावाला कोण पाणी देईल का हो पाणी, असा प्रश्न कल्याण गावच्या प्रत्येक नागरिकाच्या चेहऱ्यावर दिसत होता.

कल्याण गाव आमदार भीमराव तापकीर यांनी दत्तक घेतले. त्या वेळी पाण्याचा प्रश्न सोडविला जाईल, अशी अपेक्षा गावातील नागरिकांना होती. मात्र, त्या पाच वर्षांत एकही योजना राबविली गेली नाही. सध्याच्या परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचा नळ पाणीपुरवठा हा दहा ते पंधरा दिवसांतून एकदाच होत असतो, तर इतर दिवशी महिलावर्ग गावातील विहिरीतून पाणी उपसून हांडे डोक्यावर घेऊन आणत असल्याचे चित्र दिसत आहे. मात्र, अजून दोन-तीन आठवड्यांनंतर पिण्याच्या पाण्याची टंचाईसुद्धा जाणवणार, हे निश्चितच आहे, असे कल्याण गावचे सरपंच राजेश डिंबळे व सामाजिक कार्यकर्ते ह्रषीकेश डिंबळे यांनी सांगितले.

## निश्चितच तोडगा काढला जाईल : शेजवळ

आम्ही कल्याण गाव दत्तक घेतले आहे. पाण्यासह इतर परिस्थितीची पाहणी केली आहे. पुढील काही दिवसांत भूजल सर्वेक्षणाचे पथक मागविणार असून, पाण्याची परिस्थिती काय आहे? त्यावर काय उपाययोजना करता येतील? याबाबत सविस्तर माहिती घेणार आहे. गावामध्ये कोणत्या अडचणी आहेत, त्या कशा पद्धतीने दूर करता येतील? याबाबत मार्गदर्शन करणार असून, त्यावर निश्चितच तोडगा काढला जाईल, असे ऑल इंडिया शिवाजी मेमोरिअल सोसायटी अभियांत्रिकी महाविद्यालय समन्वयक डॉ. नाना एन. शेजवळ यांनी सांगितले.

दरम्यान कल्याण गाव मागील पाच वर्षे लोकप्रतिधिंनी दत्तक घेतले होते. त्यावेळी पाण्याचा प्रश्न सोडविला जाईल अशी अपेक्षा गावातील नागरिकांना होती, मात्र त्या पाच वर्षात पाण्याबाबत एकही योजना राबविली गेली नाही. सध्याच्या परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचा नळ पाणी पुरवठा हा दहा ते पंधरा दिवसातून एकदाच होत असतो तर इतर दिवशी महिला वर्ग गावातील विहिरीतून पाणी उपसून हांडे डोक्यावर घेऊन आणत असल्याचे चित्र दिसत आहे, मात्र अजून दोन-तीन आठवड्या नंतर पिण्याच्या पाण्याची टंचाई सुद्धा जाणवणार हे निश्चितच आहे असे कल्याण गावचे सरपंच राजेश डिंबळे, व सामाजिक कार्यकर्ते ऋषीकेश डिंबळे यांनी सांगितले.



**पाण्याअभावी पडीक पडलेली जमीन**

**“आम्ही कल्याण गाव दत्तक घेतले आहे. गावातील पाण्यासह इतर परिस्थितीची पाहणी केली आहे. त्याचबरोबर पुढील काही दिवसात भूजल सर्वेक्षण (पुणे विभाग) मागवणार असून पाण्याची परिस्थिति काय आहे? त्यावर काय उपाययोजना करता येतील याबाबत सविस्तर माहिती घेणार आहे. गावामध्ये कोणत्या अडचणी आहेत? व त्या कशा पद्धतीने दूर करता येतील याबाबत मार्गदर्शन करणार असून त्यावर निश्चितच तोडगा काढला जाईल.**

**डॉ. नाना एन. शेजवळ (समन्वयक- ऑल इंडिया शिवाजी मेमोरियल सोसायटी अभियांत्रिकी महाविद्यालय)**

# मनाला भावलेली एक सुंदर गोष्ट...

आता कमीपणा घेण्यातच सुख वाटतं. ' माझं चुकलं ' , बोलून शांतपणे हसत माघारी फिरण्यात आनंद वाटतो. कुणाशी वाद घालत बसण्यात मजाच उरली नाही. पहिल्यासारखं, भले हरलो तरी चालेल पण एकाच विषयावर तोंडाला फेस येईपर्यंत तासनतास चर्चा आता करू वाटतं नाही. आपलं म्हणणं समोरच्याला पटवून देण्यापेक्षा दोन पावलं मागे येण्यात शहाणपणा वाटतो. लोकं आपल्याला चुकीचं समजतील याचंही काहीच वाटतं नाही.

' चूक - बरोबर ' च्या पलीकडे पण एक जग असतं, जिथं फक्त शांतता असते. आधी दुनिया खूप पुढे चाललीये, लोकं फार वेगाने धावत आहेत, आपण या सगळ्यात मागे राहू याची भीती वाटायची, टेन्शन यायचं, पण आता सावकाश चालणंच योग्य वाटतं. कदाचित दुनियेच्या मागे राहूनच दुनिया चांगल्या प्रकारे बघता येऊ शकते. आता पुढे जाणाऱ्याला वाट करून द्यायची आणि आपण आपलं कडेच्या साइड पट्टीवर निवांत चालत राहायचं. वाटेत सुख दुःख मिळतील. हसायचं, रडायचं आणि चालत राहायचं..




कुतूहल

# उत्क्रांती आणि एंट्रोपी

**पृथ्वीवर गेली** कोट्यवधी वर्षे उत्क्रांतीचा प्रवाह सतत वाहतो आहे. त्यातूनच इथे जीवसृष्टीच्या रूपाने निसर्गाचा पसारा निर्माण झाला. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे उत्क्रांतीचा हा प्रवास, विज्ञानाच्या एका मूलभूत नियमानुसार विश्वाच्या प्रवासाच्या उलट दिशेने होतो आहे ! तो नियम आहे 'उष्मा गती शास्त्राचा दुसरा नियम' (सेकंड लॉ ऑफ थर्मोडायनामिक्स) किंवा 'एंट्रोपीचा नियम'.

'एंट्रोपी' म्हणजे काय याची तांत्रिक व्याख्या देता येईल; पण त्यातून पटकन अर्थबोध होणार नाही. पण 'एंट्रोपीतील बदल' म्हणजे काय याचा अर्थ अधिक सोपा आहे. प्रत्येक यंत्रणेला (सिस्टिमला) काही एंट्रोपी असते. एंट्रोपी वाढते तेव्हा ती यंत्रणा व्यवस्थेकडून अव्यवस्थेकडे (ऑर्डर टू डिसऑर्डर) अशी सरकते; कमी होते तेव्हा अव्यवस्थेकडून व्यवस्थेकडे (डिसऑर्डर टू ऑर्डर) असा प्रवास असतो. म्हणजे एंट्रोपी जेवढी जास्त असते, तेवढी त्या यंत्रणेतील सुसूत्र व्यवस्था कमी असते.

आता एंट्रोपीचा नियम काय सांगतो? 'या विश्वाची वाटचाल अशी असते की एंट्रोपी नेहमी वाढत जाते.' म्हणजेच आपले विश्व व्यवस्थेकडून अव्यवस्थेच्या दिशेने सतत सरकत आहे आणि उत्क्रांतीत तर नेमके याच्या उलट घडते आहे ! इथले सारे टप्पे अधिकाधिक व्यवस्थेच्या- अधिकाधिक सुसूत्रीकरणाच्या- दिशेने सरकताना दिसतात. सुरुवातीला निर्माण झाला एकपेशीय सजीव-अमिबा ! तिथे काही गुंतागुंतच नव्हती. मग अनेक पेशींनी बनलेले सजीव आले. त्या साऱ्या पेशींमध्ये आपापसातील सुसूत्रीकरण आवश्यक ठरले. त्यासाठी व्यवस्था निर्माण व्हावी लागली. मग सजीवांमध्ये अधिक गुंतागुंतीच्या यंत्रणा निर्माण झाल्या. अन्नग्रहण करणारी यंत्रणा वेगळी.




पुनरुत्पादनाची वेगळी. श्वासोच्छवासाची वेगळी. या सर्व यंत्रणात सुसूत्रीकरण आवश्यक होते. त्यासाठी व्यामिश्र व्यवस्था निर्माण व्हावी लागली. मग जन्माला आला माणूस ! त्याचा मेंदू म्हणजे तर अतिशय गुंतागुंतीच्या आणि तरल अशा अनेक यंत्रणांच्या सुसूत्रीकरणाचा आणि सुव्यवस्थेचा परमोच्च बिंदू ! तेव्हा उत्क्रांतीचा प्रवास अधिकाधिक सुव्यवस्था निर्माण होण्याकडे आहे; तर विश्वाचा प्रवास अधिकाधिक अव्यवस्था निर्माण होण्याकडे आहे !

मग विज्ञानातला एंट्रोपीचा नियम पृथ्वीवर खोटा ठरतो का? तसे नाही ! कारण या नियमानुसार एखाद्या यंत्रणेतील एंट्रोपी कमी होणे शक्य आहे. परंतु अशा वेळेला त्या यंत्रणेची बाहेरच्या विश्वाशी ऊर्जा आणि पदार्थ (एनर्जी आणि मॅटर) यांच्या रूपात देवाण-घेवाण होते. त्यातून बाहेरच्या विश्वातील एंट्रोपी अधिक वाढते. म्हणून एकूण हिशेब विश्वाची एंट्रोपी वाढण्यातच होतो. जीवसृष्टीचे स्वरूप असेच आहे. फक्त उत्क्रांतीचा प्रवास संपूर्ण विश्वाच्या प्रवासाच्या उलट दिशेने आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

**– डॉ. सुधीर पानसे**
**मराठी विज्ञान परिषद**
**ईमेल :** office@mavipa.org
**संकेतस्थळ :** www.mavipa.org

पुढारी



एआयएसएसएमएस सोसायटीचे सहसचिव सुरेश शिंदे, विवेक सावंत यांचा सन्मान करताना उपस्थित मान्यवर.

# ग्रामीण भागातील लोकांसाठी इनोव्हेशन करा : विवेक सावंत

■ एआयएसएसएमएसच्या इंजिनिअरिंग टुडेचा समारोप

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देत ग्रामीण भागाच्या सक्षमीकरणासाठी तेथील समस्यांचे निराकरण करू शकेल असे इनोव्हेशन करावे,' असे मत महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि.चे माजी व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांनी व्यक्त केले.

ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने तीनदिवसीय 'इंजिनिअरिंग टुडे -२०२२' मोठ्या उत्साहात पार पडला, त्या वेळी सावंत बोलत होते. कार्यक्रम प्रसंगी सोसायटीचे सहसचिव सुरेश शिंदे, प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमाणे, डॉ. एन. एन. शेजवळ, विज्ञान प्रदर्शन समन्वयक प्रा. एम. पी. मावळे आदी उपस्थित होते.

आर्टिफिशिअल इंटेलिजन्ससह आपली कौशल्ये मजबूत केली, तर समाजाचा कसा फायदा करता येईल, याबाबत सावंत यांनी मार्गदर्शन केले. अमेरिकन एक्सी आणि मॅन्युफॅक्चरिंगचे अभियांत्रिकी संचालक मिलिंद कुलकर्णी यांनी तंत्रज्ञानाचे अभिसरण आणि इंडस्ट्री ४.० चे महत्त्व, यावर भाष्य करीत टॉप टेक्नॉलॉजी ट्रेंड, टेक्नॉलॉजी लिडरशिप, खासगी गाड्यांमधील ट्रेंड, इनोव्हेशन क्षमता, डिझाइन फिलॉसॉफी, ईव्ही पॉवरट्रेन या विषयांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान २२ स्पर्धांमध्ये महाविद्यालयीन तसेच इतर विद्यार्थ्यांनीही भरघोस यश मिळविले. अशा विद्यार्थ्यांचा कुलकर्णी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## सायटेक प्रदर्शनात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा सहभाग

सायटेक प्रदर्शन गुरुवारी पार पडले. या सायटेक प्रदर्शनाने भारतभरातील विद्यार्थ्यांना आकर्षित केले. राष्ट्रीय सहभागाबरोबर रशिया, जर्मनी, अमेरिका इत्यादी आंतरराष्ट्रीय सहभागी विद्यार्थ्यांनी ज्वलंत समस्यांवरील प्रकल्प जसे की हवामान संकट, औद्योगिक क्रांती ४.०, स्वातंत्र्य, समानता आणि महिलांचे सक्षमीकरण आदी प्रकल्प सादर केले.

निधन झाले. त्यांच्यापश्चात पत्नी, सून आणि २ नातवंडे आहेत.



# मतदान करायचे, तर नोंदणी करून घ्याच

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : आपले नाव मतदारयादीत असणे व मतदान करणे हासुद्धा देश सेवेचाच एक भाग आहे. १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक सज्ञान नागरिकाला भारतीय संविधानाने मताधिकार बहाल केलेला आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येकाच्या मताला समान महत्त्व असल्याने मताधिकार ही मोठी ताकद आहे. मात्र, यासाठी सर्वप्रथम मतदारयादीत नाव नोंदणी करणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. नाना शेजवळ यांनी केले.

महाराष्ट्र मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली असून, यांतर्गत मतदार नोंदणी मोहीम राबविली. याचाच एक भाग म्हणून १८ वर्षे वयावरील देशाच्या प्रत्येक युवक - युवतीने आपले नाव मतदारयादीत समाविष्ट करून राष्ट्रीय कर्तव्य बजावले पाहिजे. लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी भारत निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी कार्यालय निवडणूक विभाग, पुणे आणि एआयएसएसएमएसचे अभियांत्रिकी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने नवमतदार नावनोंदणी विशेष महाशिबिराचे आयोजन केले होते.

## महाअभियान

महाअभियानाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अश्विनी गोडबोले व बीएलओ राजेश बहादूर, शेजवळ सर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रशासकीय आधिकारी अभिजित भोसले, प्रा. सोनवणे, प्रा. श्रीमती तरंगे, सर्व बीएलओ आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन कार्यक्रम आधिकारी डॉ. नाना शेजवळ यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी प्रतिनिधी सायली कोळी, भूषण शिंदे, आदिल आणि सोहम आदींनी यशस्वीपणे केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव श्री मालोजीराजे छत्रपती सहसचिव सुरेश शिंदे, अजय पाटील व प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमणे यांनी शुभेच्छा दिल्या.

# भाजीपाला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोंढवा : पुणे महापालिकेच्या निधीतून कोट्यवधी रुपये ... करून कोंढव्यात हॉस्पिटल व ... मार्केट बांधण्यात ... मोठा गाजावाजा ... उद्घाटन करूनही हे ... सामान्यांसाठी खुले ... आल्याने शिवसेना ... बाळासाहेब ठाकरे यांच्या ... मोफत भाजीपाला वाटून ... आंदोलन करण्यात आले.

माँ खदीजा प्रसूतिगृह ... हजरत अब्दुल रहमान ... पुणे महापालिकेच्या ...

# धर्मादाय

लोकमत न्यूज नेटवर्क

लष्कर : आझाद समाज पार्टी ... आर्मीच्या ... महाराष्ट्रातील सर्व ... रुग्णालयातील दुर्बल ... रुग्णांच्या उपचारावरून ... असलेल्या हेळसांडबाबत ... दखल घेतली. आरोग्य ... गरजवंतांना मिळवून ... प्रयत्न करावा, धर्मादाय ... जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना ... विचारा, वेळप्रसंगी ... लढाईसाठी देखील ... आवाहन भीम आर्मी आणि ... समाज पक्षाचे प्रमुख ...

सकाळ

## विश्वजित घोष यांचे आवाहन : पोखरी येथे प्रौढ साक्षरता अभियान सुरू

# लोकांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवा

फुलवडे ता. १० : ''प्रत्येक नागरिकाला शिक्षण मिळाले, तर तो साक्षर व सक्षम होऊन समाजाच्या सर्व वर्गापर्यंत विकासाच्या प्रवाहात येईल, त्यासाठी तळागाळातील सर्व स्तरातील लोकांना साक्षर केले पाहिजे. लोकांपर्यंत ही शिक्षणाची गंगा पोहोचावी, म्हणून अनेक समाजसेवकांनी कसोशीने प्रयत्न केले आहेत,'' असे प्रतिपादन रोटरी इंडिया लिटरसी मिशनचे राष्ट्रीय प्रमुख विश्वजीत घोष यांनी केले.



पोखरी (ता. आंबेगाव) : महाविद्यालयात प्रौढ साक्षरता अभियान प्रारंभप्रसंगी उपस्थित मान्यवर, शिक्षक, स्वयंसेवक आणि प्रौढ वर्ग.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रोटरी इंडिया लिटरसी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने पोखरी (ता. आंबेगाव) येथील श्री पंढरीनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित प्रौढ साक्षरता अभियान शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रत्येक प्रौढ साक्षर व्यक्तीचा अभ्यासक्रम संपल्यानंतर परीक्षा घेतली जाणार असून त्यामध्ये उत्तीर्ण झालेल्या नागरिकांना विद्यापीठ व रोटरी इंडिया लिटरसी मिशनकडून साक्षरतेचे प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच अभियानात काम करणाऱ्या स्वयंसेवकांना रोटरी इंडिया लिटरसी मिशनकडून मानधन देणार असल्याची माहिती प्रकल्पाचे विद्यापीठ प्रतिनिधी व जिल्हा समन्वयक डॉ. नाना शेजवळ यांनी दिली.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई, जिल्हाप्रमुख कल्याणी गोखले, ममता कोलाटकर, रोटरी क्लब पुणेचे समन्वयक निरंजन माथुरे, श्री पंढरीनाथ विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब कोल्प, ग्रामस्थ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शशिकांत साळवे यांनी केले. संयोजन सायली कोळी, समृद्धी सोनवणे, दिनेश जाधव यांनी केले. ममता कोलाटकर यांनी आभार मानले.

# कठोर परिश्रमाने स्वप्न सत्यात उतरते : आयुष प्रसाद

**पुणे, ता. १२ :** ''एखादे स्वप्न मनाशी बाळगताना ते पूर्ण होण्यासाठी एकनिष्ठपणा, जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम असणे खूप महत्त्वाचे आहे. शॉर्टकटमुळे कोणतीही गोष्ट जास्त काळ टिकत नाही. सत्याचा मार्ग आणि प्रामाणिकपणे केलेल्या प्रयत्नांमुळे जीवनात यशस्वी होण्यास नक्कीच मदत होते,'' असा सल्ला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी 'यिन'च्या विद्यार्थ्यांना दिला.

यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क अर्थात यिन आणि ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या वतीने 'ओळख प्रशासनाची' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. याअंतर्गत 'यिन'च्या कोअर टीमने नुकतीच पुणे जिल्हा परिषद येथे भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना प्रसाद यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, ''यूपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांना अवघड, कठीण परीक्षा न समजता आव्हानात्मक परीक्षा म्हणून पाहणे जास्त गरजेचे आहे. पूर्व परीक्षेचा सराव करताना त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकासाला महत्त्व द्यावे. आयुष्यभर शिकाऊ वृत्ती ठेऊन हसत-खेळत आपले आयुष्य आनंदाने जगावे.'' प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमाने व डॉ. नाना शेजवळ यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. भेटीला यिनचे अध्यक्ष आशुतोष साठे, वैष्णवी बोली, प्रतीक शिंदे, सोहन घाडगे, सायली कोळी आणि अनिष मुखर्जी आदी उपस्थित होते.

> **या उपक्रमामुळे प्रशासन कसे चालते, त्यांचे कामकाज कसे पहिले जाते, त्यातील विविध विभाग कसे कार्यरत असतात, याची संपूर्ण माहिती या भेटीदरम्यान आम्हाला मिळाली.**
> **- आशुतोष साठे,** यिन अध्यक्ष, एआयएसएसएमएस



**जिल्हा परिषद, पुणे : 'सीईओ' आयुष प्रसाद यांच्यासोबत यिनचे सदस्य मंडळ.**

डीपीवर शिवसेनेच्या नगरसेवकांमध्ये संभ्रमावस्था असताना, शहर शिवसेनेच्या वतीने आयोजित केलेल्या परिसंवादाला सेनेच्या चौदा नगरसेवकांनीच दांड्या मारल्या, तर पुणेकरांचाही फारसा प्रतिसाद लाभला नाही. त्यामुळे आगामी काळात विरोधी पक्ष म्हणून शिवसेना डीपीवर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

शहर शिवसेनेच्या वतीने डीपी विरोधात शहरातील सर्व मुख्य चौकांमध्ये तसेच महापालिका भवनासमोर घंटानाद आंदोलन करण्यात आले. यावेळी काही नगरसेवकांची अनुपस्थिती होती.

परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु, या परिसंवादाला सेनेचा एकही नगरसेवक हजर नव्हता. तसेच पुणेकरांचाही फारसा प्रतिसाद लाभला नाही. त्यावर पक्ष नेत्यांना विचारणा केली असता शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांकडून सदोष डीपी विरोधात मतदानाचा व्हीप काढण्यात आला असून, मुख्य सर्वसाधारण सभेत सेनेचे चौदा नगरसेवक विरोधात मतदान करतील, असा विश्वास व्यक्त केला.

परंतु, शनिवारवाडा येथील परिसंवादात ज्येष्ठ नगररचना अभ्यासक अनिता गोखले, पर्यावरण तज्ज्ञ सुजित पटवर्धन,

असल्याचे सांगितले. नियोजन समितीकडून डीपीच्या अहवालातील हरकती सूचनांवर कायद्यानुसार अंतिम निर्णय अपेक्षित होता. मात्र कुठेही कुठलाही निर्णय देण्यात आलेला नाही. एकही स्पष्ट नकाशा नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आलेला नाही. काही मूठभर लोकांचे आरक्षण उठविण्यासाठी नगर नियोजन समितीने कामकाज केले असून, हा विकास आराखडा घाईघाईने मंजूर केल्यास त्याचे दुष्परिणाम पुणेकरांना भोगावे लागतील, असा सूर परिसंवादात उमटला.

# अभियंत्यांनी ग्रामविकासात योगदान द्यावे: काळभोर

**पुणे :** अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी करावा, असे मत साधना सहकारी बँकेचे संचालक सुभाष काळभोर यांनी व्यक्त केले.

ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरीयल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे घेण्यात आलेल्या 'राष्ट्रीय सेवा योजना' विशेष शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. संजय दानव, डॉ. नाना शेजवळ, एम. पी. चव्हाण आदी उपस्थित होते. काळभोर म्हणाले, नव्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात अभियंत्यांची भूमिका फार महत्त्वाची व जबाबदारीची आहे. त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग ग्रामविकासाठी करावा. प्राचार्य डॉ. संजय दानव म्हणाले, छत्रपती शाहू महाराजांचा विचारांचा वारसा घेऊन



ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या 'राष्ट्रीय सेवा योजने'त सहभागी विद्यार्थी व शिक्षक वृंद

सुरू झालेल्या संस्थेचा प्रत्येक विद्यार्थी समाजसेवेचे काम पुढे घेऊन जाईल. महाविद्यालयातर्फे सात दिवसांचे लोणी-काळभोर येथील कोळपे वस्ती-रामदरा येथे शिबिर घेण्यात आले. शिबिरात ग्राम स्वच्छता अभियान, जलसंधारण, श्रमदान, संगणक साक्षरता अभियान, ऊस तोडणी कामगारांचे जीवन वास्तव, गड संवर्धन, पर्यावरण विकास व संतुलन, महिला सबलीकरण आदी कार्यक्रम घेण्यात आले. तसेच याप्रसंगी 'पंचायतराज', ग्रामीण विकास, धर्म आणि विज्ञान या विषयांवर व्याख्याने झाली. शिबिराच्या समारोपाप्रसंगी ग्रामपंचायतीच्या सदस्या कांताबाई केसकर, मल्हारी कोळपे, ग्रामपंचायतीचे सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# गॅसच्या अनुदानासाठी येत्या महिना अखेरपर्यंत मुदत

**पुणे :** स्वयंपाक गॅसचे अनुदान थेट बँक खात्यात जमा करण्याच्या योजनेसाठी (डीबीटीएल) एलपीजी क्रमांक आणि बँक खाते यांची जोडणी करण्यात (विस्थापने या शेजवळ उपस्थित होते. महिनाअखेर पर्यंत मुदत आहे. त्यानंतर जोडणी न केलेल्या

दाखल करण्यात आ
तरुणीला पळवून कुं
विकणारा सोजन उर्फ
शहाबाद ढाका, जि. जो
देश) याच्यासह

क्रमांक एमसीओ-२०१
(१९६५, चा महा. ४०) (
(१), (१क) आणि (२)
क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये सं
स्थानिक क्षेत्रासाठी वडगांव
(१),(१क) आणि (२) य
तिचा मसुदा यासोबत जोड
२. उक्त अधिसूचने
यांच्याकडे, त्याची लेखी
३. उक्त कालावधीम

क्रमांक एमसीओ-
अधिनियम १९६५, (१९
क चे पोट - (१) (१
१/नवि-१४, दि. १ मा
शासनाने पुणे जिल्ह्याती
क्षेत्रासाठी वडगांव नगरपं
अधिसूचना काढण्याच्य
आणि ज्याअर्थी,
आणि ज्याअर्थी,
यासोबत जोडलेल्या अ
वाटते.
त्याअर्थी आता,
वापर करून व त्याचा
म्हणून विनिर्दिष्ट करीत
वडगांव नगरपंचायत
मध्ये विनिर्दिष्ट केल्या

संक्रमणा

संक्रमणात्मक क्षेत्रा

MAHARAS
TOWNSHI
NO.MC
and (3) of
Townships
of Maharas
ferred by s
local area
rural area
Panchayat
is appende
2. Ar
required
or before
3. A

या वेळी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मार्गदर्शन केले. इंगळे यांनी करियरच्या बाबतीत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. के. आर. हरणे, मंडलाचे कोशाध्यक्ष मोहन देशमुख, नीरज शेटे, प्रा. एस. ए. पाटील, प्रा. डी. ओ. पाटील, प्रा. आर. व्ही. पाटील, प्रा. नीरजा जैन उपस्थित होते.

### ग्रामस्वच्छता अभियान, जलसंधारण

ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाच्या वतीने विशेष निवासी शिबिर कोळपेवस्ती-रामदरा (ता. हवेली) येथे घेण्यात आले. शिबिरात ग्रामस्वच्छता अभियान, जलसंधारण, श्रमदान, संगणक साक्षरता अभियान, गडसंवर्धन, पर्यावरण विकास व संतुलन, महिला सबलीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन या विषयांवर ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात आले. ऊर्जा बचतीचे महत्त्व या वेळी ग्रामस्थांना सांगितले. विद्यार्थ्यांनी गाव, गड, रस्ते, गटार व रामदरा शिवायल परिसराची स्वछता केली. विनय र. र. यांनी धर्म व विज्ञान या विषयावर व्याख्यान दिले. एम. पी. चव्हाण, कांता केसकर, मल्हारी कोलपे, प्राचार्य डॉ. संजय दानव, डॉ. नाना शेजवळ उपस्थित होते.

वाघोली प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असणाऱ्या गावांमधून पाच कुष्ठ रुग्ण आढळून आले आहेत. त्यांचा उपचार वाघोली प्राथमिक केंद्रात चालू आहे. कुष्ठरोग हा उपचाराने पूर्ण बरा होत असल्यामुळे रुग्णांनी काहीही घाबरण्याचे कारण नसल्याचे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय सोनवणे व डॉ. स्नेहल घोडेराव यांनी 'दै. पुढारी'शी बोलताना सांगितले.

दरवर्षी आरोग्य विभागाकडून राष्ट्रीय निर्मूलन कार्यक्रमांतर्गत संशयित कुष्ठरोगी शोधमोहीम राबवली जाते. यामध्ये संशयित रुग्ण आढळल्यास रुग्णांचे समोपदेशाद्वारे आधार देऊन रोगाबाबत गैरसमज दूर करून त्यांना रुग्णालयात दाखल करून घेतले जाते. कुष्ठरोग हा इतर रोगांपेक्षा थोडा वेगळा असला तरी लवकर निदान व योग्य उपचारानंतर हा रोग पूर्णतः आटोक्यात आणता येतो. कुष्ठरोगाचा इतिहास हा मानवी इतिहासाइतकाच जुना आहे. पूर्वी कुष्ठरोग म्हणजे हातापायाची बोटे झडणे, वाकडी होणे, नाक बसके होणे अशा विकृती डोळ्यापुढे येत. १९४० पर्यंत या रोगासाठी काहीच उपाययोजना नसल्याने रुग्णांना रोगाच्या सर्व अवस्थांमधून जाण्याचा प्रसंग येत होता. आता मात्र प्रभावी बहुविध उपचार पद्धतींमुळे रोग बरा करणे शक्य झाले आहे.

> ट्युबरक्युलॉइड रोगाचे निदान चट्ट्यावरील बधिरपणामुळे करता येते. याउलट लेप्रोमॅटस प्रकारात प्राथमिक अवस्थेत बधिरपणा नसतो व निदान करण्यासाठी त्वचेचा छेद घेऊन काढलेल्या द्रव्याची सूक्ष्मदर्शकाखाली तपासणी करावी लागते. अशा तपासणीत लेप्रोमॅटस रोग्यांमध्ये रोगाच्या प्रकारानुरूप जंतू आढळतात. मात्र ट्युबरक्युलॉइड प्रकारच्या रोग्यांमध्ये रोगजंतूंची संख्या इतकी कमी असते की, चट्ट्यावरील कातडीचा छेद घेऊन काढलेल्या द्रव्यात जंतू आढळत नाहीत. कुष्ठरोग हा उपचारानंतर पूर्णतः बरा होतो. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही.
>
> **- डॉ. संजय सोनवणे, डॉ. स्नेहल घोडेराव**
> वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र, वाघोली

**कुष्ठरोगाची लक्षणे :**

कुष्ठरोगाचे आणखी ... म्हणजे एका जंतूमुळे होणाऱ्या ... रुग्णांमध्ये त्यांच्या रोगप्रतिक... लक्षणांमध्ये विविधता दिसून येते ... असलेल्या रुग्णामध्ये रोग निर्मि... एक किंवा दोन चट्ट्यांपर्यंतच ... जाते. या प्रकारच्या आजारास ... आजार म्हणतात. याउलट ... रोगप्रतिकारकशक्ती नगण्य असले... हातपाय, छाती, पाठ अशा सर्व ... जंतूंची बेसुमार वाढ झाल्याने ला... व चकचकीत दिसू लागते. या प्रक... लेप्रसी म्हणतात. कुष्ठरोगाचे ... लालसर असू शकतात. काही रुग...

# दुर्गम भागात वाचन चळवळ पोचविणार

## श्री शिवाजी सोसायटीच्या अभियांत्रिकी तरुणाचा पुढाकार : पानशेतजवळ वाचनालय सुरू

**खडकवासला :** दुर्गम डोंगरी भागात वाचन चळवळ पोचविण्यासाठी पुण्यातील ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यायातील तरुणांनी पुढाकार घेतला आहे. जागतिक विज्ञानदिनाचे औचित्य साधून अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पानशेत जवळील रूळे (ता. वेल्हे) येथे वाचनालय सुरू करून तेथे ७०० पुस्तके भेट दिली.

अभियांत्रिकी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नानासाहेब शेजवळ यांच्या अथक परिश्रमातून रूळे ग्रामपंचायतीच्या जुन्या कार्यालयात



पानशेत जवळील रुळे येथे वाचनालयाला पुस्तके भेट देताना अभियांत्रिकी महाविद्यालयाचे व स्थानिक विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ.

वाचनालय सुरू करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन दै. 'पुढारी'चे वितरण व्यवस्थापक मिलिंद जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दै. पुढारीचे वितरण प्रतिनिधी सुनील नवले, दत्ता नलावडे, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.आर. नाक्ती सरपंच छाया नथुराम उघडे, ग्रामसेवक तसेच विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

अभियांत्रिक महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी रूळे व परिसरातील दुर्गम वाड्या वस्त्यांतील विद्यार्थी, तरुणांमध्ये वाचन चळवळ वाढीस लागावी. त्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी विविध प्रकारची ७०० पुस्तके वाचनालयासाठी, गोळा केली आहेत.

पुण्यातील विविध संख्या, व्यक्तिंनी ही पुस्तके भेट दिली आहेत. यावेळी जगताप म्हणाले, मोबाईल तसेच टीव्ही सिरियल मुळे वाचनाकडे दुर्लक्ष वाढले आहे. विधायक उपक्रमात दैनिक पुढारी नेहमी पुढे आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाने सुरू केलेल्या या उपक्रमामुळे तरुणांपुढे आदर्श उभा राहणार आहे. प्रास्ताविक प्रा. शेजवळ यांनी केले. सूत्रसंचालन कोमल शितोळे हिंने केले.

# प्रभ... सोड...

**हडपसर :** ...

हडपस... हा प्रभाग क्र... सर्वसाधारण... पुणे महापालि... सार्वत्रिक ... निवडणुकीत... जनता पार्टी... मारुती आब... हे चांगल्या ... आले आहे... आबा तुपे ... चांगल्या प... अपेक्षा नाग... येथील नाग... सुरळीत.सा... रस्ते व ... ही अपेक्षा ... आबा तुपे ... संघ शाखेत... त्यांनी गोरग... माध्यमातून ... कार्य या भा... जोडुनच ... काम केले... विचार श्रेण...


## मराठीचा अभिमान बाळगावा

**हडपसर : वार्ताहर**

मराठी भाषा आपली मातृभाषा असून तिचे संवर्धन व विकास करणे हे आपले कर्तव्य आहे. इतर भाषा शिकाव्यात परंतु मराठीचा अभिमान बाळगावा असे मत साधना ...

## संपामुळे बँका बंद; ग्राहकांचे हाल

पिंपरी : शहरातील बँकांनी देशभरात सुरू असलेल्या संपामध्ये सहभाग घेतला आहे. त्यामुळे सर्वच राष्ट्रीयीकृत बँकांनी यामध्ये सहभाग ... नॅशनल, बँक ऑफ बडोदासह इतर बँका सहभागी झाल्या आहेत. बँकांच्या या संपामुळे सामान्य नागरिकांचे हाल होणार आहेत. बँक बंदमुळे ...





ऐतिहासिक दुर्ग नारायणगडाच्या पायथ्याशी थांबलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक आणि शिक्षक.

# 'एनएसएस 'तर्फे गडसंवर्धन शिबिर

कॉलेज क्लब रिपोर्टर

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसाठी ३ ते ५ मार्चदरम्यान विद्यापीठस्तरीय 'गडसंवर्धन शिबिर' आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात पुणे, नाशिक आणि नगर जिल्ह्यातील कॉलेजांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे एकूण १०० स्वयंसेवक आणि नारायणगाव कॉलेजचे २० स्वयंसेवक होते. नारायणगाव कॉलेजचे प्रा. लहू गायकवाड यांनी 'युगपुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर व्याख्यान दिले. शिवाजी ट्रेल संघाचे विनायक खोत यांनी 'जुन्नर तालुक्यातील गडकिल्ले' याबाबत माहिती दिली.

ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे आणि कार्याध्यक्ष अनिल मेहेर यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झाले. नारायणगाव कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी नाणेघाट, जीवधन, कुकडेश्वर मंदिर, चावंड, शिवनेरी, लेण्याद्री, ओझर या ठिकाणी नेऊन प्रा. गायकवाड यांनी माहिती दिली. तिसऱ्या दिवशी ऐतिहासिक दुर्ग नारायणगडावर जाऊन तेथे पुरातन घरांचे अवशेष आणि पाण्याच्या टाक्या पाहिल्या. मनोज हाडवळे यांनी गडसंवर्धनाबद्दल माहिती दिली. डॉ. श्रीकांत फुलसुंदर, डॉ. दत्तात्रय मोहिते, डॉ. मंगल डोंगरे आदींनी आयोजन केले. प्राचार्य श्रीकांत शेवाळे यांनी आभार मानले.

**- संदेश थोरवे**




# 'एआयएसएसएमएस' विद्यालयामध्ये दाखविला उरी

पुणे,दि. २७ - ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या (एआयएसएसएमएस) अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमास साताऱ्याचे आर्मी वेल्फेअर ऑफिसर नंदकुमार चावरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमणे, 'एनएसएस'चे समन्वयक डॉ. एन. एन. शेजवळ आदी उपस्थित होते. कारगिल युद्धात भारतीय सैनिकांनी सीमेवर केलेल्या अतुलनीय पराक्रमाने भारताची शान वाढली आहे. यातील शहीद जवानांच्या कार्याची आपण सतत आठवण ठेवायला हवी आहे, असे चावरे यांनी सांगितले आहे. कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थी समन्वयक गौरी खापरे यांनी केले होते. यावेळी शाहीद शेख यांनी कविता सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहित मेहेर, ओमकार गायकवाड यांनी केले. आभार महेश पाटील यांनी मानले.

यावेळी राज्य शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे 'उरी-द सर्जिकल स्ट्राईक' हा चित्रपट उपस्थितांना दाखविण्यात आला.

पिंपरी–चिंचवड
# रोखठोक
धार शब्दांची... प्रहार लेखणीचा...!


## ए.आय.एस.एस.एम.एस अभियांत्रिकी महाविद्यालयात

# 'कारगिल विजय दिवस' साजरा

। चिंचवड / रोखठोक प्रतिनिधी ।

[illegible], २९ जुलै: ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने २६ जुलै रोजी ' कारगिल विजय दिवस' चे आयोजन करण्यात आले. साताऱ्याचे आर्मी वेल्फेअर ऑफिसर नंदकुमार चावरे या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

गेल्या अनेक वर्षांपासून महाविद्यालयात ' कारगिल विजय दिवस' मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याप्रसंगी बोलताना चावरे म्हणाले ' कारगिल युध्दात भारतीय सैनिकांनी सीमेवर केलेल्या अतुलनीय पराक्रमाने भारताची आन, बाण आणि शान वाढली आहे. भौगोलिक दृष्ट्या अतिशय कठीण असलेल्या या युध्दात भारताने पाकिस्तानचा पराभव केला. या विजयासोबतच ज्या सैनिकांनी या युद्धात आपले प्राणार्पण केले, त्या शहीद जवानांची आपण आठवण ठेवायला हवी. यावेळी त्यांनी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचे आणि त्याला आपल्या जवानांनी दिलेल्या प्रत्युत्तराचे अनेक रोमांचकारी अनुभव सांगितले.




राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. एन. एन. शेजवळ यांनी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयात राबवीत असलेल्या विविध प्रकल्पाची माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमने यांनी ' कारगिल विजय दिवस' महत्त्व स्पष्ट करीत सैनिकांच्या शौर्यगाथेचे कौतुक केले., आणि विद्यार्थ्यांना तुमच्यातील 'सोल्जर' कायम जागृत ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची विद्यार्थी समन्वयक गौरी खापरे हिने कार्यक्रमाचे आयोजन केले. कारगील विजय दिवसाचे औचित्य साधत शाहीद शेख यांनी कविता सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मोहित मेहेर आणि ओमकार गायकवाड यांनी केले. तर आभार प्रदर्शन महेश पाटील यांनी केले.


Malhar Misal
Aundh - Ravet BRTS Road, Near Kokane Market, Jagtap Dairy Chowk, Rahatani. Call : 099228 88003

Oaramella's
Cake Shop & Cafe



गणेश हुंबे: मुख्य संपादक, ९७६६०१५१११, ९६२३०३४४४४

नवभारत

# एमआईटी-आलंदी में 'ग्रामीण विकास' पर ऑनलाइन सेमिनार

नवभारत न्यूज नेटवर्क

पुणे. आलंदी स्थित एमआईटी कला, वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय में उन्नत भारत अभियान के तहत 'ग्रामीण विकास' विषय पर ऑनलाइन सेमिनार का आयोजन किया गया. महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना विभाग के तहत इस सेमिनार का आयोजन किया गया. सेमिनार में प्रमुख मार्गदर्शक के तौर पर उन्नत भारत अभियान के नोडल अधिकारी डॉ. नाना शेजवल उपस्थित थे. उन्होंने छात्रों को ग्रामीण क्षेत्र तथा जनता का विकास कैसे करें इसके संदर्भ में विस्तार से मार्गदर्शन किया. सेमिनार की शुरुआत में महाविद्यालय के प्राचार्य डॉ. बी. बी. वाफारे ने प्रस्तावना रखी.

## उन्नत भारत अभियान की दी जानकारी

महाविद्यालय के 'उन्नत भारत' अभियान तथा राष्ट्रीय सेवा योजना के अधिकारी प्रा. श्रीराम कारगांवकर ने उन्नत भारत अभियान की विस्तार से जानकारी दी. प्रा. संगीता बोर्डे ने कार्यक्रम का सूत्रसंचालन किया. प्रा. अर्चना अहेर ने सभी वक्ताओं का परिचय कराया, जबकि प्रा. दीक्षा कदम ने आभार प्रकट किए. कार्यक्रम के लिए महाविद्यालय के प्रकल्प संचालक विजय खोडे ने शुभेच्छा दिए. उपप्राचार्य डॉ. मानसी अतीतकर, उपप्राचार्य प्रा. अक्षदा कुलकर्णी सभी विभागप्रमुख, शिक्षक और कर्मचारी ऑनलाइन उपस्थित थे.



येरवडा : गेनबा सोपानराव मोझे महाविद्यालयाच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात वृक्षारोपण करताना विद्यार्थ्यांसह प्रा. ज्योती भोसले, प्रा. डॉ. उमा काळे, प्रा. राम पालकर.

# विद्यार्थ्यांकडून तुळापूरमध्ये ग्रामस्वच्छता

**विश्रांतवाडी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व येरवडा येथील गेनबा सोपानराव मोझे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सातदिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर तुळापूर येथे नुकतेच पार पडले.

या शिबिराचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष रामभाऊ मोझे, अलका पाटील, प्राचार्य इंद्रायणी जाधव यांच्या उपस्थितीत झाले. त्या वेळी तुळापूर ग्रामपंचायतचे सरपंच गणेश पुजारी, उपसरपंच राहुल राऊत, पुष्पा शिवले, अमोल शिवले, मुख्याध्यापक जाधव, कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्योती भोसले, प्रा. राम पालकर आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वच्छ व स्वस्थ भारत योजनेअंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. यात ग्रामस्वच्छता, संभाजी महाराजांच्या समाधी परिसरातील स्वच्छता, खंडोबा मंदिर परिसर स्वच्छता, वृक्षारोपणासाठी खड्डे खणणे आदी कामांचा समावेश होता. तसेच पथनाट्य सादर करून स्वच्छता, भ्रष्टाचार, हुंडाबळी या विषयीच्या नाटिका सादर करून विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.

शिबिरस्थळी विद्यार्थ्यांना प्रा. राजश्री शेंडगे, प्रा. उत्तरा काळदुरे, शेखर सक्करणे पाटील, अण्णासाहेब चव्हाण आणि डॉ. क्रांती परदेशी यांनी व्याख्यानाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. उमा काळे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून प्रल्हाद कांबळे, सुषमा गोरे, बिस्मिल्ला पिंजारी, सलोनी भोसले, आकाश गायकवाड आदी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे येरवडा विभागीय समन्वयक डॉ. नाना शेजवळ उपस्थित होते.

# 'कारगिल विजयानंतर भारताच्या परराष्ट्र नीतीत आमूलाग्र बदल'

**प्रतिनिधी, पुणे**



**कारगिल युद्धाला** भारत-पाकिस्तान दोन्ही राष्ट्रांनी केलेल्या अणुचाचणीची पार्श्वभूमी होती. हे युद्ध लढणे भारतासाठी भौगोलिकदृष्ट्या जास्त कठीण होते. परंतु, दुर्दम्य इच्छाशक्ती आणि अतुलनीय साहसाच्या जोरावर भारताने विजय मिळवला. हा विजय पुढच्या अनेक पिढ्यांना प्रेरणादायी ठरणार आहे. या युद्धाने परराष्ट्रनीती, आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर घेतली जाणारी भूमिका आणि सामाजिक अभिसरण यांमध्ये आमूलाग्र बदल घडून आला, असे प्रतिपादन मेजर जनरल शशिकांत पित्रे यांनी केले. कारगिल युद्धातील भारतीय सेनेचा विजय हा अतुलनीय शौर्याचे, पराक्रमाचे प्रतीक असून कारगिल विजय दिवस हा तमाम भारतीयांच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे, असेही त्यांनी सांगितले.

ऑल इंडिया शिवाजी मेमोरियल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कारगिल विजय दिवस कार्यक्रमात पित्रे बोलत होते. संस्थेचे सहसचिव सुरेश शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमाने या वेळी उपस्थित होते.

पित्रे म्हणाले, ''कारगिल लढाईत भारतीय लष्कराने अनोख्या युद्धनीतीचा आणि तत्कालीन सरकारने राजकीय मुत्सद्देगिरीचा अवलंब करत पाकिस्तानी आक्रमणाचा पाडाव केला. सध्याच्या परिप्रेक्ष्यात युद्धजन्य परिस्थिती दिसत असली तरी, युद्ध होईलच असे ठामपणे सांगू शकत नाही. परंतु, युद्धासाठी लष्कराला सदैव सज्ज रहावे लागते.'' शिंदे, बोरमाने यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. नाना शेजवळ, सूत्रसंचालन भारत जेजुरकर यांनी केले. निकिता आंब्रे यांनी आभार मानले.

महाराष्ट्र टाइम्स
PLANET CAMPUS
उज्ज्वल भविष्यासाठी

कॅम्पस हॅपनिंग्ज

# कारगिल दिनानिमित्त चावरे यांचे व्याख्यान

**पुणे :** ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे २६ जुलैला 'कारगिल विजय दिवस' साजरा करण्यात आला. साताऱ्याचे सैनिक कल्याण अधिकारी नंदकुमार चावरे या वेळी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.


'कारगिल युद्धात भारतीय सैनिकांनी सीमेवर केलेल्या अतुलनीय पराक्रमाने भारताची मान उंचावली आहे. भौगोलिकदृष्ट्या अतिशय कठीण असलेल्या या युद्धात भारताने पाकिस्तानचा पराभव केला,' असे



नंदकुमार चावरे

चावरे म्हणाले. राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ एन. एन. शेजवळ यांनी प्रास्तविक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस बोरमने यांनी 'कारगिल विजय दिवसा'चे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थी समन्वयक गौरी खापरे हिने कार्यक्रमाचे आयोजन केले. शाहीद शेख यांनी कविता सादर केली. मोहित मेहेर आणि ओंकार गायकवाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. महेश पाटील यांनी आभार मानले.

# आग विझविण्याचे प्रात्यक्षिक...



**पुणे :** आग आटोक्यात कशी आणावी, आग पसरू नये, यासाठी कोणती काळजी घ्यावी, अग्निशमन दल कोणते काम करते याबद्दलचे प्रात्यक्षिक व माहिती ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना पुणे अग्निशमन दल जवान आणि अधिकारी विजय भिलारे यांनी दिली.

बुधवार । दि. ७ ऑगस्ट २०१९ ■ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६२९/१९५७, वर्ष ८८, अंक : २१६

# प्रभात

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net

# विज्ञान, तंत्रज्ञानात भारतीय युवक आघाडीवर - डॉ. अरविंद शाळीग्राम

## भौतिकशात्र अभ्यासक्रम-बदल प्रशिक्षण शिबिरास प्राध्यपकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पिंपरी, दि. ६ (प्रतिनिधी) - विज्ञान आणि अभियांत्रिकी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जागतिक स्तरावर देखील विज्ञान आणि तंत्रज्ञानात भारतीय युवक आघाडीवर आहेत. इतलीमध्ये आयसीटीपीच्या संचालकपदावर महाराष्ट्राचे युवा अभिनेते अतिश दाभोलकर यांची नियुक्ती गौरवास्पद आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विज्ञान तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. अरविंद शाळीग्राम यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय व संशोधन केंद्र (पीसीसीओईआर) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीसीसीओईआर यांच्या संयुक्त विद्यमाने, प्रथम वर्ष अभियांत्रिकी भौतिकशास्त्र विषयाच्या नवीन अभ्यासक्रमाचे प्राध्यापकांसाठी प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. या वेळी विद्यापीठ अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एन. एम. मुजुमदार, सदस्य डॉ. कांदळकर, पीसीसीओईआरचे प्राचार्य डॉ. हरीष तिवारी, विभाग प्रमुख प्रा. सोनाली कणसे आदींसह शंभरहून अधिक प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. एन. एम. मुजुमदार म्हणाले की, अभ्यासक्रमात काळानुरूप बदल होणे आवश्यक आहे. त्यानुसार आजच्या तरुणाईला नवनवीन विषयांचे ज्ञान उपलब्ध करून देणे हे विद्यापीठाचे काम आहे. या शिबिरातून प्राध्यापकांना मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने याचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा विद्यार्थ्यांना उपयोग होईल असेही त्यांनी सांगितले.

प्रकल्प मूलभूत शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यास उपयुक्त आहे. प्रथम वर्षा ते चतुर्थ वर्ष अभियांत्रिकी शिक्षणामध्ये नवनवीन कल्पना



रावेत : प्राध्यापकांसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिरात उपस्थित प्राध्यापक वर्ग.

पुरस्कृत प्रकल्प विद्यार्थी साकारू शकतात. या शिक्षण पद्धतीमुळे संशोधनास पुरेसे पोषक वातावरण निर्माण होते व असे शिक्षण देण्यावर पीसीईटी नेहमीच प्रयत्नशील असते, असे पीसीसीओईआरचे प्राचार्य डॉ. हरीष तिवारी यांनी प्रास्ताविकात सांगितले.

डॉ. रोहिणी पानावकर यांनी प्रकल्प आधारित शिक्षण पद्धती राबविण्याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. एस. व्ही. आरळीकर, प्रा. वी.के. चौधरी, डॉ. उमेश मोहरील यांनी प्रथम वर्ष अभियांत्रिकी मधील भौतिकशास्त्र विषयाच्या नवीन अभ्यासक्रमाचे उपस्थित प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले. संयोजन प्रा. प्रिया ओपे, सूत्रसंचालन प्रा. दीपशिखा श्रीवास्तव व प्रा. संदीप बोरगावकर यांनी आभार मानले.

Vo)) LTE LTE 60% 19:48

CITY

# Abeda Inamdar Senior College felicitated volunteers of flood relief

TNN | Updated: Oct 9, 2019, 17:36 IST

AA



Sangli-Kolhapur flood relief workers were honoured by Abeda Inamdar Senior College and the Incredible Pune Group recently. The President of Maharashtra Cosmopolitan Education Society, Dr. P A Inamdar, UN Representative Dr. Nihal Mayur, Incredible Pune correspondent Asif Bagwan, Principal of Abeda Inamdar

This is what happens when you use WD-40 as engine oil

# व्यसनमुक्तीसाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा

## डॉ.अनिल अवचट यांचे आवाहन : व्यसनमुक्ती कार्यशाळेचे उद्‌घाटन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२ -** आजची युगातील शाळेच्या विद्यार्थ्यांना पार्ट्यांची सवय लागल्यामुळे विद्यार्थी व्यसनाधीन होतात. काही लोक अतिमानसिक आणि शारीरिक तणाव यामुळे व्यसनाधीन होतात. दारू, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करू नये व इतरांना त्यापासून परावृत्त करावे. धुव्वा मुक्त युवा हे अभियान राबवून समाजाची जनजागृती करावी, असे मत मुक्तांगण व्यसन मुक्ती केंद्राचे संस्थापक डॉ. अनिल अवचट यांनी व्यक्त केले आहे. आगामी



काळात व्यसनमुक्ती कार्यशाळा घेण्याची गरज पडू नये म्हणून विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, राष्ट्रीय सामाजिक डिफेन्स संस्था, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी पुण्यातील तीस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली होती. या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी अवचट बोलत होते. यावेळी क्षेत्रीय कार्यालयातील 'एनएसएस' अधिकारी संजय शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस बोरमने, एनएसएसचे जिल्हा समन्वयक डॉ.विलास उगले, डॉ. शिवाजी पाचारणे, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. एन. एन. शेजवळ, मुक्तांगणचे समुपदेशक मिलिंद कार्लेकर, प्रा.मनीषा बोरा आदी उपस्थित होते.

प्रभात
Sun, 13 October 2019
epaper.eprabhat.net/c/44606239

संस्थेचे अध्यक्ष पृथ्वीराज सरनोबत, नायकू खवरे, प्राचार्य सिमा सांगरूळकर, बाबासाहेब शेलार यांचे सहकार्य लाभले.

# गौरी करपे हिचा सत्कार

**पुलाची शिरोली:** येथील गौरी ज्ञानदेव करपे हिची पुणे येथील श्री. छत्रपती शिवाजी मेमोरियल अभियांत्रिकी



कॉलेजच्या जनरल सेक्रेटरीपदी बिनविरोध निवड झाली आहे.

तसेच सावित्रीबाई फुले विद्यापीठ पूणे येथे एन.एस.एस विभागासाठी स्टुडंट को. ऑर्डीनेटर म्हणून निवड झाली आहे. तिचा सत्कार आयटी तज्ञ व सल्लागार के. के. बिरनाळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्य डी. एस. बोरमाने, डॉ. एन. एन. शेजवाळ आदी उपस्थित होते.



# A device to store solar energy may be here thanks to Indian scientist, team

## The hybrid device captures heat from the sun and stores it as thermal energy

**OUR BUREAU**

New Delhi, November 22

Storing solar energy for later use has always been a big challenge. A young Indian scientist — currently a post-doc in a US university — and his colleagues may have just overcome this hurdle.

The device, designed by Varun Kashyap and others at the University of Houston, is not only capable of harvesting solar energy efficiently, but also storing it until it is required.

The work can have a range of applications, from power generation to desalination to distillation, the scientists said in a paper published in the journal *Joule* recently.

Kashyap, who completed his B.Tech from Visvesvaraya Technological University, Bengaluru, in 2015, is currently a post-doctoral associate at Cornell University.

### How the device works?


Unlike solar panels and solar cells, which rely on photovoltaic technology for the direct generation of electricity, the hybrid device captures heat from the sun and stores it as thermal energy. It addresses some of the issues that have stalled wider-scale adoption of solar power, suggesting an avenue for use of solar energy round the clock, despite limited sunlight hours, cloudy days and other constraints.

Scan & Share

The work, carried out by Kashyap and others while at the lab of Hadi Ghasemi at the University of Houston, combines molecular energy storage and latent heat storage to produce an integrated harvesting and storage device for potential round-the-clock operation. The researchers claimed a harvesting efficiency of 73 per cent on small-scale operations and as much as 90 per cent on a large scale.

### Energy efficiency

Remarkably, at night, the energy stored by the hybrid system is recovered with an efficiency of 80 per cent and at a higher temperature than in the day, in contrast to all of the state-of-the-art systems, the scientists claimed in the paper.




The hybrid device consists of a molecular storage material and a localised phase-change material, separated by a silica aerogel to maintain the necessary temperature difference. UNIVERSITY OF HOUSTON

The high efficiency harvest is due, in part, to the ability of the device to capture the full spectrum of sunlight, harvesting it for immediate use and converting the excess into molecular energy storage, said Ghasemi, Bill D. Cook Associate Professor of Mechanical Engineering and a corresponding author for the paper.

### Storage material

The device was synthesised using norbornadiene-quadricyclane as the molecular storage material, an organic compound that the researchers said demonstrates high specific energy and exceptional heat release while remaining stable over extended storage times, the scientists said in a statement.

T Randall Lee, chemistry professor at the University of Houston and another corresponding author, said the device offers improved efficiency in several ways: The solar energy is stored in molecular form rather than as heat, which dissipates over time, and the integrated system also reduces thermal losses because there is no need to transport the stored energy through piping lines.

"During the day, the solar thermal energy can be harvested at temperatures as high as 120 degrees centigrade," said Lee."

At night, "when there is low or no solar irradiation, the stored energy is harvested by the molecular storage material, which can convert it from a lower energy molecule to a higher energy molecule.

"That allows the stored energy to produce thermal energy at a higher temperature at night than during the day, boosting the amount of energy available even when the sun is not shining, he said.

पुढारी

# जिद्द, चिकाटीने ध्येय गाठता येते

## सहायक पोलिस निरीक्षक कीर्ती म्हस्के यांचे प्रतिपादन

**मांडवगण फराटा: वार्ताहर**

गरिबी शिक्षणात अडसर ठरत नसून जिद्द व चिकाटीच्या जोरावर ध्येय निश्चित गाठता येते, असे प्रतिपादन सहायक पोलिस निरीक्षक कीर्ती भरत म्हस्के यांनी व्यक्त केले.


इनामगाव (ता.शिरूर) येथे श्री बसंतराव फराटे कला, वाणिज्य महाविद्यालय व लोकनेते दादा पाटील फराटे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात कीर्ती म्हस्के बोलत होत्या. या वेळी सरपंच मंगल म्हस्के, शिवाजी मचाले, माउली शिंदे, दिलीप निंबाळकर, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य तुकाराम सावंत, कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम पवार, प्रा. अविनाश ढोबळे व प्रा. सुरेखा देशमुख, प्रा. रमेश शितोळे, प्रा. आश्विनी शिंदे, प्रा. शीतल क्षीरसागर, प्रा. सोनाली तोगे, प्रा. योगेश जोंधळे व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

म्हस्के महणाल्या, घरची परिस्थिती हलाखीची असूनही आई मंगल या अशिक्षित असूनही आम्हा तीन बहिणींना ग्रामीण भागात शिक्षणाची सुविधा नसतानाही शिकवले. त्यामुळे आज आम्ही तीन बहिणी या पोलीस खात्यात उच्च पदांवर कार्यरत आहोत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खचून न जाता गरिबीचा न्यूनगंड न बाळगता उच्च ध्येय ठेवून मार्गक्रमण करावे असे त्यांनी सांगितले. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक गिरिजा भरत म्हस्के यांनीही मुलींना मार्गदर्शन केले. या वेळी समाजप्रबोधनकार बाळकृष्ण शिंदे यांनी विनोदाच्या माध्यमातून व्यसनापासून कसे दूर राहावे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. जयराम पवार यांनी केले. प्रा. अविनाश ढोबळे यांनी आभार मानले.



**इनामगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात बोलताना सहायक पोलिस निरीक्षक कीर्ती भरत म्हस्के.**

Pune Gramin Edition
6 Jan, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com



# घंटा

संवाद




अर्जुन ताकटे, ९४२३९२६०४७

माझ्या गावात मारुती मंदिर आणि त्याच्या शेजारीच असणाऱ्या शंकराच्या मंदिरात मराठी शाळेचे वर्ग भरायचे. शंकराच्या मंदिराच्या माडीवर आमचा सातवीचा वर्ग भरायचा. तेव्हा शाळेला स्वतंत्र घंटा नव्हती. मारुतीच्या मंदिराची आणि शाळेची घंटा एकच होती. येता जाता ज्याला पाहिजे तेव्हा कोणीही केव्हाही कितीही वेळा घंटा वाजवायचा. शाळा भरताना फक्त लक्षात ठेवायचे व सुटण्यासाठी गुरुजींना विचारून घंटा वाजवायची. लक्षात राहिले तर ठीक नाहीतर बऱ्याच वेळा शाळा एक ते दोन तास उशिरा सुटायची. कुणालाही कुठेही जाण्याची अजिबात घाई नसायची. गुरुजी, बाई गावातच राहात असे. वर्गातील बऱ्यापैकी मुले मंदिरातच झोपायला यायची. मी आणि माझे काही मित्र मंदिराच्या माडीवर रात्री झोपायला यायचो. खाली काही म्हातारी माणसे व इतर मंडळी असायची.

मंदिरात कासार काकादेखील झोपायला यायचे. पण मंदिरात आल्यानंतर उगाचच चौकशी करत बसायचे. रिकाम्या पंचायती करायची त्यांना सवय होती. एका रविवारी मी आणि माझ्या काही मित्रांनी नदीकाठी असणाऱ्या आजीच्या शेतातील सामबोरीची बोर व पाटलाच्या शेंगा चोरून भरपेट खाल्ल्या आणि सोबतसुद्धा आणल्या. पण आमची ही रानमेवा खाण्यासाठी केलेली चोरी उघडकीस येण्यास कासार काकांची मदत झाली होती. त्यामुळे आमचा त्यांच्यावर मोठाच राग होता.

वर्गातला सत्या म्हणायचा, हा कासार काका मंदिरातूनच पळून लावला पाहिजे. पण या मिशनला आम्हाला काही मुहूर्त सापडत नव्हता. उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या आणि ही गोष्ट आम्ही मनावर घेतली. नानाने बाजारच्या गावावरून एक रुपयाचा पतंगाचा काळा पक्का आणि लांबच लांब बारीक दोरा आणला. सत्याने रात्र होण्याच्या सुमारास गदाला जोडीला घेऊन तो दोरा त्या मारुती मंदिराच्या घंटेला बांधला. कोणालाही दिसणार नाही अशा पद्धतीने ओढून आम्ही झोपायचो त्या ठिकाणी कोणालाही दिसणार नाही अशा मार्गाने आणून बांधला आणि घरी निघून गेला. सगळे रात्री उशिरा मंदिरात आले. झोपले.

रात्री केव्हातरी नाना उठला. सर्वच गाढ झोपेत आहेत, याची खात्री झाल्यानंतर त्याने दोरा ओढायला सुरुवात केली. रात्रही अमावस्येची निवडली. काळाकुट्ट अंधार, गार वारा सुटलेला. रातकिड्यांची किरकिर तर चालूच होती. अशा वेळी मारुती मंदिराची घंटा वाजू लागली. सोनार काका उठले. काठी टेकवत, चाचपडत शेजारील मारुती मंदिराकडे निघाले. म्हातारं माणूस, दिसायलाही कमी. तरीही सारखे डोकावून पाहात होते. घंटा एवढ्या रात्री कोण वाजवत होते? काका उठून जाऊ लागले की, नाना घंटा वाजवायची थांबवायचा. काका त्यांच्या बिछान्यावर गेले की, पुन्हा वाजवणे चालू करायचा. किमान अर्धा तास तरी असे चालले असेल. काका खूपच भेदरले. अखेर न राहावून त्यांनी हाका मारायला सुरुवात केली. सोनार काकांच्या आवाजाने सर्वच जागे झाले. चौकशी सुरू झाली. म्हणे मारुतीची घंटा आपोआप वाजते, कसे शक्य आहे? पुन्हा सर्व जण झोपी गेले. किमान अर्ध्या तासाने पुन्हा मारुतीची घंटा वाजू लागली. कासार काकाला काही चैन पडेना. त्यांना घाम फुटला, काय करावे समजेना. माडीवर झोपेचे सोंग घेतलेले गदा व नाना, यांना हसू आवरेना म्हणून तोंडात गोधडी घालून, स्वत:चे हसू दाबत होते. त्यांची झालेली फजिती पाहून बऱ्यापैकी मित्रमंडळी सुखावले होते. कासार काकाने साऱ्या गावात मारुतीच्या घंटेची जाहिरात केली. मारुती मंदिरातील घंटा आपोआप वाजते, याचे सर्वांनाच कुतूहल वाटले. काहींनी याकडे लक्ष देण्याचे टाळले. तर काहींनी दुसऱ्या रात्री बघू..म्हणून विषय थांबवला. असा तसा दिवस गेला. रात्र झाली. कासार काका खोकत मंदिरात आलेच. काही लोक आज मारुती मंदिरातदेखील झोपले. सर्वांनाच पाहावयाचे होते की, घंटा आपोआप वाजते कशी? रात्र झाली. काय करू? घंटा वाजू की नको, अशी शंका नानाच्या मनात आली. पण ज्या ज्यासाठी हे केले, ते तर झालेच नाही. तेव्हा घंटा वाजलीच पाहिजे. रात्री बारानंतर घंटा वाजू लागली. इकडे कासार काका उठायच्या आत, तिकडे मारुती मंदिरात लोबा गर्दी झाली. इकडे मंदिरात माडीवर असणाऱ्यांना याची कल्पना नव्हती. हा हा म्हणता सारा गाव गोळा झाला. कोणी काठी आणली, कोणी कंदिल आणले, कोण काय आणत तर कोण काय, एकाने टेंभा आणला आणि थेट त्या मारुती मंदिरातील घंट्याजवळ नेला, तेव्हा त्याला बांधलेला बारीक काळा दोरा दिसला. टेंभ्याच्या जाळामुळे तो जळाला. त्या क्षणी वाजणारी घंटा बंद झाली. तसा दोऱ्याचा शोध सुरू झाला. तो थेट शंकराच्या मंदिराच्या माडीपर्यंत.लोकांची गर्दी, कंदिल, जळणारे टेंभे पाहून मुले तेथून पळाली. दुसऱ्या दिवशी सगळ्यांनाच मोठा मार मिळाला. एक मात्र झाले.तेव्हापासून कासार काका कधीही मंदिरात आले नाही.



ऐतिहासिक दुर्ग नारायणगडाच्या पायथ्याशी थांबलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक आणि शिक्षक.

# 'एनएसएस'तर्फे गडसंवर्धन शिबिर

CCR | कॉलेज क्लब रिपोर्टर |

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसाठी ३ ते ५ मार्चदरम्यान विद्यापीठस्तरीय 'गडसंवर्धन शिबिर' आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात पुणे, नाशिक आणि नगर जिल्ह्यातील कॉलेजांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे एकूण १०० स्वयंसेवक आणि नारायणगाव कॉलेजचे २० स्वयंसेवक होते. नारायणगाव कॉलेजचे प्रा. लहू गायकवाड यांनी 'युगपुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर व्याख्यान दिले. शिवाजी ट्रेल संघाचे विनायक खोत यांनी 'जुन्नर तालुक्यातील गडकिल्ले' याबाबत माहिती दिली.

ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे आणि कार्याध्यक्ष अनिल मेहेर यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झाले. नारायणगाव कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी नाणेघाट, जीवधन, कुकडेश्वर मंदिर, चावंड, शिवनेरी, लेण्याद्री, ओझर या ठिकाणी नेऊन प्रा. गायकवाड यांनी माहिती दिली. तिसऱ्या दिवशी ऐतिहासिक दुर्ग नारायणगडावर जाऊन तेथे पुरातन घरांचे अवशेष आणि पाण्याच्या टाक्या पाहिल्या. मनोज हाडवळे यांनी गडसंवर्धनाबद्दल माहिती दिली. डॉ. श्रीकांत फुलसुंदर, डॉ. दत्तात्रय मोहिते, डॉ. मंगल डोंगरे आदींनी आयोजन केले. प्राचार्य श्रीकांत शेवाळे यांनी आभार मानले.

**- संदेश थोरवे**

Scanned by CamScanner

# सैन्य दलांत युवकांचे योगदान हवे

## मेजर जनरल शशिकांत पित्रे यांचे आवाहन

**पुणे : प्रतिनिधी**

भारताच्या संरक्षण व्यवस्थेत युवकांनी योगदान द्यावे, असे आवाहन मेजर जनरल शशिकांत पित्रे यांनी केले. ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कारगिल विजय दिवस कार्यक्रमात ते बोलत होते.

मेजर जनरल पित्रे यांनी, १९९९ मध्ये झालेल्या कारगिल युद्धाची पार्श्वभूमी, पाकिस्तानची त्या मागील असलेली भूमिका आणि भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर कोंडीत पकडण्याचा डाव, पाकिस्तानच्या सैनिकांनी भारतीय हद्दीत घुसून केलेला कब्जा या सर्वांना भारतीय



सैन्याने दिलेले सडेतोड उत्तर आणि असंख्य कारगिल युद्धातील प्रसंग आजच्या युवा पिढीसमोर प्रत्यक्ष उभे केले. युवकांना भारतीय सुरक्षा व्यवस्थेमध्ये योगदान देण्याचे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव एम. पी. शिंदे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बोरमाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी कारगिल शहीद स्मारकाची भव्य प्रतिकृती तयार केली होती.

सर्व मान्यवरांनी शहीद स्मारकाला श्रद्धांजली अर्पण केली. रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. नाना शेजवळ यांनी प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन भारत जेजुरकर यांनी केले. निकिता आंत्रे यांनी आभार मानले.


Scanned by CamScanner

# कॅशलेस अर्थव्यवस्थेवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन


पुणे : ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील एनएसएसच्या विद्यार्थ्यांना कॅशलेस अर्थव्यवस्थेविषयी व्यंकटेश कल्याणकर यांनी मार्गदर्शन केले. नोटबंदीनंतर देशात कॅशलेस व्यवहाराविषयी संभ्रम निर्माण झाला असून, या विषयावर सर्वस्तरात जनजागृती केली जात आहे. कॅशलेस व्यवहार करण्यासाठी कोणकोणत्या सुविधांचा कसा वापर करायचा याची माहिती असणे गरजेचे आहे. या कार्यक्रमात कल्याणकर म्हणाले, नव्या पिढीने आपल्या आजूबाजूच्या लोकांना बँकिंग आणि ऑनलाइन व्यवहारांबाबत साक्षर करणे आवश्यक आहे. शंभर टक्के कॅशलेस अर्थव्यवस्था उभारणे शक्य नसल्याचेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले. या वेळी एनएसएसचे प्रकल्प अधिकारी एन. एन. शेजवळ, प्रा. वाघमारे, डी. एस. कुलकर्णी, बँक ऑफ बडोदाचे माहिती तंत्रज्ञान अधिकारी रोहन माहेश्वरी उपस्थित होते.



**नगरसेवक सचिन दोडके मित्र परिवार आयोजित**

**प्रभाग क्र. ३२ वारजे माळवाडी, रामनगर**



१ ले बक्षीस मुंबई ट्रीप



२ रे बक्षीस टाटा नॅनो कार


Scanned by CamScanner

# एमआयएसएमएसमध्ये शिवांजली महोत्सव साजरा

**ऑल इंडिया** श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा शिवांजली महोत्सव नुकताच झाला. अभिनेत्री डॉ. आदिती गोवित्रीकर यांनी महोत्सवाला हजेरी लावली. 'आयुष्यात कायम ध्येयनिष्ठ असायला हवे.

अभियांत्रिकीचा अभ्यास करताना सर्वांगीण विकास होण्यावर लक्ष केंद्रित करा,' असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. संस्थेचे सचिव मालोजीराजे छत्रपती, प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमने, सहसचिव सुरेश शिंदे, संस्थेचे खजिनदार अजय पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

गोवित्रीकर यांच्या हस्ते खेळाडू विद्यार्थी म्हणून आशुतोष सुतार, अश्मी कटारिया, कलावंत विद्यार्थी म्हणून श्रेया वाशीकर, एनएसएस कार्यकर्ता म्हणून विनय राऊत, गौरी करपे, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून रोशन शिंदे आणि संगणक विभागाला पारितोषिक देण्यात आले.

# करोनाबाबत जनजागृतीसाठी 'एनएसएस' स्वयंसेवकांचा पुढाकार

**पुणे, दि. २३** - राज्यात करोनाग्रस्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा अहोरात्र लढत आहे. या भीषण संकटात 'ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटी'च्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि उन्नत भारत अभियानचे स्वयंसेवकांनी जनजागृतीसह इतर कार्यासाठी पुढाकार घेतला आहे.

एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी नाना शेजवळ यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित आहेत. आतापर्यंत ३ हजार कुटुंबांचा सर्वे करून 'आरोग्य सेतू' ॲप डाऊनलोड करून दिले व त्याविषयी मार्गदर्शनही केले. स्वप्निल पवार हा स्वयंसेवक पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागात सेवा देत आहे. अनिकेत जिवडे हा लॉकडाऊन काळामध्ये औरंगाबाद येथे पोलीस मित्र म्हणून काम करत आहे. सार्वजनिक ठिकाणी वॉल पेंटिंग करून तो करोना जनजागृती करत आहे. तसेच, परिसराचे निर्जंतुकीकरण करून करोनाला आळा घालण्याचा प्रयत्न करत आहे. 'नो स्पिटींग कॅम्पेन'मध्ये महाविद्यालयाचा एनएसएस विभाग देशात अव्वल आहे. प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमणे यांनी सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाइन सभा घेऊन सरकारच्या नियमांचे पालन, स्वयंशीस्त व जनजागृतीसाठी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या सामाजिक उपक्रमांना संस्थेचे सचिव मालोजीराजे छत्रपती, सहसचिव, सुरेश शिंदे, खजिनदार अजय पाटील हे सहकार्य करत आहेत.

प्रभात Sun, 24 May 2020
epaper.eprabhat.net/c/52177074

# 'एआयएसएसएमएस'तर्फे स्वयंसिद्ध हॅकेथॉन स्पर्धा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'उच्च शिक्षणसंस्थांनी आपल्या ज्ञानाचा वापर ग्रामीण विकासासाठी केला पाहिजे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या तंत्रज्ञानाचा उपयोग आदिवासी आणि ग्रामीण भागांतील लोकांसाठी केल्यास, भारत एक प्रगत राष्ट्र म्हणून ओळखले जाईल,' असे मत उन्नत भारत अभियानचे राष्ट्रीय समन्वयक प्रा. वीरेंद्रकुमार विजय यांनी व्यक्त केले.

ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या (एआयएसएसएमएस) अभियांत्रिकी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या स्वयंसिद्ध हॅकेथॉन स्पर्धेच्या ऑनलाइन उद्घाटनप्रसंगी ते विजय बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डी. एस. बोरमाने म्हणाले, 'ग्रामीण विकासासाठी महाविद्यालयाने पुणे जिल्ह्यातील पाच गावे दत्तक घेतली आहेत. मळवंडी गावाला आर. ओ. प्रकल्प सुरू केला आहे. गावात शोषखड्डे तयार केले आहेत. शाळेला संगणक संच भेट दिले आहेत.'

## स्पर्धेबाबत...

स्वयंसिद्ध हॅकेथॉन ही राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. यामध्ये ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यासाठी नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर केले जाणार असून, त्यासाठी शेतीचा विकास, आरोग्य व बायोमेडिकल उपकरणे, ग्रामीण प्राथमिक शिक्षण, महिला सक्षमीकरण, जलव्यवस्थापन, उद्योजकता, अक्षय ऊर्जा विषय आहेत.

महाविद्यालयाचे उन्नत भारत अभियानचे समन्वयक डॉ. नाना शेजवळ यांनी लॉकडाउनच्या काळात उन्नत भारत अभियानांतर्गत गावात गरजू लोकांना जीवनावश्यक वस्तू व मास्कचे वाटप करण्यात आल्याचे सांगितले. संस्थेचे मानद सचिव मालोजीराजे छत्रपती यांनी 'स्वयंसिद्ध हॅकेथॉन २०२०'साठी शुभेच्छा दिल्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऋचा भोसले यांनी, तर सूत्रसंचालन प्रतीक धनवाले यांनी केले.

# ‘एआयएसएसएमएस’तर्फे स्वयंसिद्ध हॅकेथॉन स्पर्धा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

‘उच्च शिक्षणसंस्थांनी आपल्या ज्ञानाचा वापर ग्रामीण विकासासाठी केला पाहिजे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या तंत्रज्ञानाचा उपयोग आदिवासी आणि ग्रामीण भागांतील लोकांसाठी केल्यास, भारत एक प्रगत राष्ट्र म्हणून ओळखले जाईल,’ असे मत उन्नत भारत अभियानचे राष्ट्रीय समन्वयक प्रा. वीरेंद्रकुमार विजय यांनी व्यक्त केले.

ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या (एआयएसएसएमएस) अभियांत्रिकी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या स्वयंसिद्ध हॅकेथॉन स्पर्धेच्या ऑनलाइन उद्घाटनप्रसंगी ते विजय बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ डी. एस. बोरमाने म्हणाले, ‘ग्रामीण विकासासाठी महाविद्यालयाने पुणे जिल्ह्यातील पाच गावे दत्तक घेतली आहेत. मळवंडी गावाला आर. ओ. प्रकल्प सुरू केला आहे. गावात शोषखड्डे तयार केले आहेत. शाळेला संगणक संच भेट दिले आहेत.’

### स्पर्धेबाबत...

स्वयंसिद्ध हॅकेथॉन ही राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. यामध्ये ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यासाठी नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर केले जाणार असून, त्यासाठी शेतीचा विकास, आरोग्य व बायोमेडिकल उपकरणे, ग्रामीण प्राथमिक शिक्षण, महिला सक्षमीकरण, जलव्यवस्थापन, उद्योजकता, अक्षय ऊर्जा विषय आहेत.

महाविद्यालयाचे उन्नत भारत अभियानचे समन्वयक डॉ. नाना शेजवळ यांनी लॉकडाउनच्या काळात उन्नत भारत अभियानांतर्गत गावात गरजू लोकांना जीवनावश्यक वस्तू व मास्कचे वाटप करण्यात आल्याचे सांगितले. संस्थेचे मानद सचिव मालोजीराजे छत्रपती यांनी ‘स्वयंसिद्ध हॅकेथॉन २०२०’साठी शुभेच्छा दिल्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऋचा भोसले यांनी, तर सूत्रसंचालन प्रतीक धनवाले यांनी केले.

नवभारत

# एमआईटी-आलंदी में 'ग्रामीण विकास' पर ऑनलाइन सेमिनार

नवभारत न्यूज नेटवर्क

पुणे. आलंदी स्थित एमआईटी कला, वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय में उन्नत भारत अभियान के तहत 'ग्रामीण विकास' विषय पर ऑनलाइन सेमिनार का आयोजन किया गया. महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना विभाग के तहत इस सेमिनार का आयोजन किया गया. सेमिनार में प्रमुख मार्गदर्शक के तौर पर उन्नत भारत अभियान के नोडल अधिकारी डॉ. नाना शेजवल उपस्थित थे. उन्होंने छात्रों को ग्रामीण क्षेत्र तथा जनता का विकास कैसे करें इसके संदर्भ में विस्तार से मार्गदर्शन किया. सेमिनार की शुरुआत में महाविद्यालय के प्राचार्य डॉ. बी. बी. वाफारे ने प्रस्तावना रखी.

## उन्नत भारत अभियान की दी जानकारी

महाविद्यालय के 'उन्नत भारत' अभियान तथा राष्ट्रीय सेवा योजना के अधिकारी प्रा. श्रीराम कारगांवकर ने उन्नत भारत अभियान की विस्तार से जानकारी दी. प्रा. संगीता बोर्डे ने कार्यक्रम का सूत्रसंचालन किया. प्रा. अर्चना अहेर ने सभी वक्ताओं का परिचय कराया, जबकि प्रा. दीक्षा कदम ने आभार प्रकट किए. कार्यक्रम के लिए महाविद्यालय के प्रकल्प संचालक विजय खोडे ने शुभेच्छा दिए. उपप्राचार्य डॉ. मानसी अतीतकर, उपप्राचार्य प्रा. अक्षदा कुलकर्णी सभी विभागप्रमुख, शिक्षक और कर्मचारी ऑनलाइन उपस्थित थे.

लोकमत




# राष्ट्रीय सेवा योजनेचे सामाजिक उपक्रम

शिवणे : ऑल इंडिया श्री छत्रपती मेमोरियल सोसायटी अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे आणि उन्नत भारत अभियानच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संक्रमण रोखण्यासाठी मास्क, सॅनिटायझर, वाफेची मशीन, किराणामालचे वाटप करण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमणे, डॉ. नाना शेजवळ, सरपंच रंजना ढोरे, गोरख ढोरे, धनंजय ट्रिळे आदी उपस्थित होते.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 2 Nov 14, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# कल्याण येथे दत्तक गाव युवा सप्ताह




लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** ए.आय.एस. एस. एम. एस.चे अभियांत्रिकी महाविद्यालय येथील एन. एस. एस. विभाग आणि उन्नत भारत अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवा सप्ताह' दत्तक गाव हवेली तालुक्यातील कल्याण येथे साजरा केला. या सप्ताहा निमित्त वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिर, कोविड-१९ जनजागृतीसाठी तज्ञ डॉक्टरांच्या व्याख्यानाचे आयोजन, मोफत औषधे, मास्क, सनिटायझर वाटप करण्यात आले. गावाची पाण्याची समस्या सोडविण्यासाठी बंधाऱ्याची पाहणी व सर्वे केला.

प्राचार्य डॉ. दत्तात्रय बोरमने यांनी 'भारत हा कृषिप्रधान देश असला तरी, नवीन विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर केला तर, भारत महासत्ता होण्यास फार उशीर लागणार नाही. त्यासाठी सतत प्रत्येक नागरिकाने प्रयत्नशील राहणे, युवकांनी नवीन तंत्रज्ञान अवगत करून त्याचे उपयोजन गावात करावे' असे प्रतिपादन केले.

सरपंच राजेश डिंबळे यांनी गावातील विकासा बरोबर समस्यांचाही आढावा घेतला. तर एन. एस. एस कार्यक्रम अधिकारी डॉ. नाना शेजवळ यांनी आजच्या युवा पिढीने आपल्या विज्ञान-तंत्रज्ञान कौशल्याचा उपयोग ग्रामीण विकासासाठी करावा असा आशावाद व्यक्त केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने गावकऱ्यांनी व इतर मान्यवरानी देखील नव्या पिढीबद्दलच्या अपेक्षा व्यक्त केल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमाने, रासेयो समन्वयक डॉ. नाना शेजवळ, सरपंच राजेश डिंबळे, विभागप्रमुख डॉ. डांगे, डॉ. भालके, डॉ. नांगरे, प्रा. जाधव, प्रा. गवई, उपसरपंच व सर्व समिती सदस्य, कल्याण ग्रामस्थ, महिला मंडळ, महाविद्यालयातील कर्मयोगी आणि एन. एस. एस. विभागाचे स्वयंसेवक यांचे सहकार्य मिळाले.




# नदीप्रेमींचा 'माय रिव्हर-माय व्हॅलेंटाइन' उपक्रम

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १३** - शहरातील नदीप्रेमींनी ११ ठिकाणी नदीपात्रातील घाटावर स्वच्छता करत 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन' उपक्रम साजरा केला. यात शहरातील सुमारे ८० महाविद्यालयांतील तरुण, नदीप्रेमी नागरिक तसेच स्वयंसेवी संस्थेचे सदस्य सहभागी झाले होते.

पुणेकर फाउंडेशनमार्फत राबवलेल्या या उपक्रमांतर्गत शहरातील ओंकारेश्वर, वृद्धेश्वर, गरवारे, खडकवासला, वारजे, एस. एम. जोशी या सर्व घाटांवर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाची सांगता डेक्कन परिसरातील भिडे पूल या ठिकाणी झाली. या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष पराग मते, राज देशमुख, भाजपचे सरचिटणीस राजेश पांडे, उपाध्यक्ष अनिल मते, महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या सहकारी अधिकारी डॉ. केतकी घाटे, संस्थेच्या आम्रपाली चव्हाण, नीलेश जंजिरे, स्वप्नील पवार, चंकी पांडे, समीर पावलसते, दत्ता बालशंकर सहभागी झाले होते.

प्रभात Mon, 14 February 2022
https://epaper.eprabhat.net/c/66220354

Hindustan Times

{ VALENTINE'S DAY } IN LOVE WITH NATURE

# 'My River, My Valentine' cleanliness drive at 13 ghats

Dheeraj Bengrut
punelettersrs@htlive.com

**PUNE:** Hundreds of students came together to clean the riverside ghats in Pune on Sunday morning under the 'My River, My Valentine' cleanliness drive held ahead of Valentine's Day which is celebrated every year on February 14. The drive was held by the National Service Scheme (NSS) of the state of Maharashtra and nearly 1,000 students from 80 colleges in Pune and Pimpri-Chinchwad participated in it.

Professor N N Shejwal from the AISSMS College of Engineering who is the NSS coordinator of the programme, said, "As we know that Valentine's day is a symbol of love and care, we turned it into love for our rivers flowing through Pune city and accordingly planned this cleanliness activity today. Eighty colleges had registered for this cleanliness drive and 30 students from each college participated in it. We identified 13 riverside ghats starting from Khadakwasla dam to Yerawada including Bhide bridge ghat and Sangamwadi ghat among others. Following all the safety norms, the students carried out the cleanliness drive from 7am to 10am with a small concluding programme held near Bhide bridge ghat at 10.30am."



**NSS students clean the river near Bhide bridge on Sunday, ahead of Valentine's Day today.** RAHUL RAUT/HT PHOTO

The cleanliness drive was held by NSS students, hosted by the AISSMS College of Engineering, and supported by the Pune Municipal Corporation (PMC) and WE Foundation. Even PMC health workers and officials were present at each of the ghats and two garbage containers were provided by the PMC at each ghat. "This cleanliness activity will now continue for days as we have assigned tasks to students for the cleanliness of their environment and also asked them to follow up at the given ghats. It is necessary to realise the importance of rivers in our lives and to maintain and clean them regularly. We got good support from the PMC officials in the drive and huge amounts of garbage were collected from each ghat," said professor Shejwal.

While students were happy to participate in the cleanliness activity, one of the participants, Gaurav Rathi, said, "I am glad that today morning, we all came together for cleaning our city and after a long time, all of us friends met due to this drive. We collected a lot of plastic bottles and other garbage from the riverside ghats. It is necessary to keep our rivers clean."

पुढारी



खडकवासला पाणलोट क्षेत्रात महाविद्यालयीन तरुण व नागरिकांनी स्वच्छता अभियान अंतर्गत गोळा केलेला कचरा.

# खडकवासला धरण व मुठा नदीच्या स्वच्छतेसाठी तरुणाई सरसावली

**खडकवासला :** व्हॅलेंटाइन डेनिमित्त पुणेकर संस्थेच्या पुढाकाराने माझी नदी उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या खडकवासला धरण, मुठा नदी स्वच्छता अभियानात हजारो महाविद्यालयीन तरुण व नागरिक सहभागी झाले होते. शहरातून वाहणाऱ्या मुठा नदीपात्रात विविध घाट, पूल अशा अकरा ठिकाणी कचरा गोळा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष परागमामा यांनी संयोजन केले. खडकवासला धरणाच्या दोन्ही तीरांवर राबविण्यात आलेल्या मोहिमेत सिंहगड कॉलेज फार्मसी व ऑल इंडिया श्री शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. शहरातील नदीपात्रातील घाटावर स्वच्छता करीत युवक-युवतींनी 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन' उपक्रम साजरा केला. ८० महाविद्यालयांतील तरुण, नदीप्रेमी नागरिक तसेच स्वयंसेवी संस्थेचे सदस्य सहभागी झाले होते. ओंकारेश्वर, वृद्धेश्वर, गरवारे, खडकवासला, वारजे, एस. एम. जोशी या सर्व घाटांवर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाची सांगता डेक्कन परिसरातील भिडे पूल या ठिकाणी झाली. या उपक्रमात संस्थेचे पराग मते, राज देशमुख, भाजपचे सरचिटणीस राजेश पांडे, डॉ. केतकी घाटे, आम्रपाली चव्हाण, नीलेश जंजिरे, स्वप्निल पवार, चंकी पांडे, समीर पावलसते, दत्ता बालशंकर आदी सहभागी झाले होते.